Vol 6 Issue 4 October 2016

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor :4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 4 | October - 2016

GRT Golden Research Thoughts

# निमगाव ता.खेड, जि.पुणे या गावाच्या सामाजिक वैशिष्ट्यांचा अभ्यास

दिलिप मुळूक[1] , डी.एम.मारकर्ड[2]
[1]सहाय्यक प्राध्यापक आणि भूगोल विभागप्रमुख , हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर., ता.खेड, जि.पुणे.
[2]सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर., ता.खेड, जि.पुणे.



**सारांश**
निमगांव हे गाव पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात भिमानदीच्या काठी वसलेले आहे. या गावाची सामाजिक रचना संमिश्र स्वरूपाची आहे. गावातील लोकसंख्येचा सामाजिक दृष्टीने विचार करताना गावची लोकसंख्या, लोकसंख्येची वैशिष्टे, वैवाहिक रचना, लिंग गुणोत्तर, स्थलांतर यांचा अभ्यास करावा लागतो. या शोध निबंधात निमगाव गावच्या सामाजिक वैशिष्टयांचा अभ्यास केलेला आहे.

## प्रस्तावना –

महाराष्ट्रातील दख्खनच्या पठारवर सहयाद्रीच्या कुशीत असलेला पुणे जिल्हा हा विविध वैशिष्टयांनी समृध्द आहे. पुणे जिल्ह्याला ज्याप्रमाणे ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे, त्याचप्रकारचा संपन्न भौगालिक वारसाही लाभलेला आहे. महाराष्ट्रातील जैवविविधता संपन्न असलेली अनेक ठिकाणे आहेत, त्यापैकीच एक ठिकाण म्हणजे पुणे जिल्हयातील खेड तालुका होय. या तालुक्यात एकुण १६२ गावे आहेत. निमगाव हे त्यापैकीच एक ऐतिहासिक वारसा लाभलेले गाव होय. निमगाव हे गाव तालुक्याच्या पूर्वेकडील भागात वसलेलले आहे.

## अभ्यासाचे उद्देश –

१.निमगाव गावाच्या सामाजिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे
२.निमगाव गावातील लोकसंख्याविषयक वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे

## अभ्यास पद्धती –

१. निमगांवामध्ये प्रत्यक्ष जाऊन सर्वेक्षण केले.
४. निमगाव गावातील लोकसंख्येचे सामाजिक आणि लोकसंख्याशास्त्रीय दृष्टीने विश्लेषण केले.

## भौगोलिक स्थान –

**1.निरपेक्ष स्थान** – निरपेक्ष स्थान हे अक्षवृत्ते आणि रेखावृत्ते यांच्या संदर्भात सांगितले जाते. निमगाव या गावाचे नकाशावरील स्थान पुढीलप्रमाणे सांगता येईल– अक्षवृत्तीय स्थान – १८°४६'३०'' उत्तर अक्षवृत्त ते १८°४६'००'' उत्तर अक्षवृत्त. रेखावृत्तीय स्थान – ७३°५५'००'' पूर्व ते ७३°५८'००'' पूर्व रेखावृत्ते

**2.सापेक्ष स्थान** – सापेक्ष स्थान आजूबाजूच्या स्थानावरून सांगितले जाते. निमगाव हे पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात वसले आहे. ते राजगुरूनगरच्या आग्नेयेस ८ कि.मी. अंतरावर असून राजगुरूनगर – आळंदी या रोडवर आहे. निमगावच्या पश्चिमेस खरपुडी, उत्तरेस रेटवडी व गोसासी, पूर्वेस दावडी आणि दक्षिणेस वाटेकरवाडी ही ठिकाणे आहेत. हे गाव भिमा नदीच्या काठी वसलेले आहे.

नकाशा क्रमांक –1. निमगावचा स्थानदर्शक नकाशा




## निमगावच्या वस्त्या व विस्तार –

राजगुरूनगरच्या पूर्वेस आठ किमी अंतरावर निमगाव हे गाव वसले आहे. राजगुरूनगरवरून दावडी मार्गे आळंदीला एक मार्ग जातो. या मार्गावर राजगुरूनगरपासून ८ कि.मी अंतरावर निमगाव आहे. या गावातून एक मार्ग आळंदीस जातो. निमगावच्या उत्तरेस रेटवडी, दक्षिणेस वाटेकर वाडी, पूर्वेस दावडी आणि पश्चिमेस खरपुडी ही गावे आहेत. निमगाव भिमा नदीच्या काठी वसलेले टुमदार गाव आहे. गावठाणाचे एकूण क्षेत्रफळ दहा एकर आहे. तर गावाचे शिवार एकूण ५७४ हेक्टरवर विस्तारलेले आहे.

गावाच्या उत्तरेस मार्तंड टेकडी नावाचा डोंगर आहे. आणि भरपूर प्रमाणात सपाट माळरान उपलब्ध आहे. मैदानांचा विचार करता संपूर्ण गाव हे एका मैदानावर वसलेले आहे.

गावठाणाबरोबरच आसपासच्या विविध वाड्यांवस्त्यांवर लोकवस्ती विखुरलेली दिसून येते. त्यामध्ये कारभारी वस्ती, आण्णा वस्ती, देऊळवाडा, भगत वस्ती, भोंडवे वस्ती, काळे वस्ती, घाट वस्ती, शिंदेवस्ती, ठाकरवाडी, तांबेबस्ती, बौद्ध वस्ती, इ. विविध नावे असलेली ही ठिकाणे आहेत.

 Volume - 6 | Issue - 4 | October - 2016

*नकाशा क्रमांक –2. निमगाव क्मह्पजंस म्समअंजपवद डवकमस*




### *निमगावची भूरचना –*

निमगाव हे गाव भीमा नदीच्या काठी वसलेले आहे. हे गाव भीमा नदीच्या उत्तरेस असणाऱ्या मार्तंड डोंगराच्या पायथ्यापासून थोडेसे दूर आहे. या गावाच्या दक्षिणेस भीमा नदी व पश्चिमेस खरपुडी हे गाव आहे. निमगाव हे गाव समुद्रसपाटी पासून २२०० फुट उंचीवर वसलेले आहे. गावाच्या उत्तरेस मार्तंड टेकडी असून तिची उंची २५७३ फुट आहे. या टेकडीवर निमगाव दावडीचे प्रसिद्ध खंडोबा मंदिर वसले आहे. या डोंगराचा भाग असाच पुढे ईशान्येकडून पूर्वेकडे गेलेला आहे. पूर्वेकडे दावडीकडे गेलेल्या डोंगर रांगेस तुकाईचे डोंगर म्हणतात. या डोंगरावर सपाट माळराने आहेत. त्यांना गायरान आणि कुराण असे म्हणतात. गावाच्या पूर्वेस थापाचा डोंगर आहे.

निमगावचा उत्तरेकडील भाग डोंगराळ प्रदेशाने आणि दऱ्या खोऱ्यांनी व्यापलेला आहे. या माळरानांवर सेझ प्रकल्पाची उभारणी केलेली आहे. उत्तरेकडून दक्षिणकडे यावे तसतशी प्रदेशाची उंची कमी कमी होत जाते. डोंगराळ माळरान संपल्यानंतर माळगाळाचा भाग येतो. त्यानंतर भिमा नदीच्या आणि तिच्या उपप्रवाहांच्या संचयन कार्यामुळे तयार झालेल्या सुपीक गाळाच्या मैदानाचा भाग दक्षिणेकडे नदीपर्यंत पसरलेला आहे.

निमगावांची भूरचना बरीचशी ओबडधोबड आणि काही प्रमाणात सपाट मैदानी आहे. वरील नकाशामध्ये भूउठाव दिसून येतो

### *सामाजिक घटक –*

### *1 लोकसंख्या –*

भूगोलाच्या अभ्यासकाला कोणत्याही भूप्रदेशाचा अभ्यास करताना मानवी घटकांचाही विचार करावा लागतो. लोकसंख्या हा मानवी घटकातील महत्त्वाचा घटक आहे. या अभ्यासामध्ये निमगाव या खेड्यातील लोकसंख्येचा व लोकसंख्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केलेला आहे. या अभ्यासामध्ये १०५ कुटुंबांचा अभ्यास केलेला आहे. हे नमूना सर्वेक्षण ४० टक्के आहे. या अभ्यासात लोकसंख्या विषयक पुढील वैशिष्ट्यांचा समावेश केलेला आहे.

### *2 धर्मनिहाय वितरण –*

निमगाव या गावातील लोकांची धर्मनिहाय लोकसंख्या पुढीलप्रमाणे

*तक्ता क्रमांक – 1. निमगाव गावचे धर्मनिहाय लोकसंख्येचे शेकडा वितरण*

| अ.क्र | धर्म | घरांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदू धर्म | ८७ | ८१.४८ |
| २ | इस्लाम धर्म | ९ | ९.२६ |
| ३ | बौद्ध धर्म | ९ | ९.२६ |
| | एकुण | १०५ | १००.०० |

*आलेख क्रमांक – 1. निमगाव गावचे धर्मनिहाय लोकसंख्येचे वितरण*




वरील विभाजित वर्तुळावरून आपल्या लक्षात येते की निमगावमध्ये हिंदूधर्मीय लोकांची संख्या खूपच जास्त म्हणजे सुमारे ८२ टक्के आहे. इस्लाम आणि बौद्धधर्मीय लोकांचे प्रमाण ६ – ६ टक्के आहे.

### *3 .लिंग गुणोत्तर –*

प्रस्तुत गाव सर्वेक्षण अहवालामध्यचे लिंग गुणोत्तर काढण्यासाठी खालील सूत्राचा उपयोग करण्यात आला आहे.

*अभ्याससूत्र:*

$$\text{लिंग गुणोत्तर} = \frac{\text{स्त्रीयांची एकुण संख्या}}{\text{पुरूषांची एकुण संख्या}} \times 1000$$

लिंग गुणोत्तरामध्ये स्त्री व पुरूषांच्या संख्येचा विचार केला जातो. दर हजार पुरूषांमागे स्त्रियांची संख्या किती आहे हे लिंग गुणोत्तरावरून लक्षात येते. ६३२ लोकांचा येथे अभ्यास केला आहे. यापैकी ३१७ पुरूष असून ३१५ स्त्रिया आहेत. हे प्रमाण १००० : ६६३ इतके आहे. हे प्रमाण महाराष्ट्राच्या लोकसंख्या प्रमाणाच्या तुलनेत कमी आहे.

*तक्ता क्रमांक – 2. निमगाव गावचे लिंगनिहाय लोकसंख्येचे शेकडा प्रमाण*

| अ.क्र | लिंग गुणोत्तर | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पुरूष | ३१७ | ५०.७८ |
| २ | स्त्रिया | ३१५ | ४९.२१ |
| | एकुण | ६३२ | १०० |

आलेख क्रमांक – 2. निमगाव गावचे स्त्री–पुरुष शेकडा प्रमाण




### 4 वयोगट रचना –

वयोगट रचना हे लोकसंख्येचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्या असते कारण लोकसंख्येमध्ये असणाऱ्या बालकांना व वृद्धांना अनुत्पादक लोकसंख्या समजली जाते. केवळ पंधरा ते साठ या वयोगटातील लोकसंख्याच उत्पादक व कार्यप्रवण लोकसंख्या असते. निमगावगावातील लोकांची वयोगटरचना पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वयोगट | लोकसंख्या | लोकसंख्या टक्केवारीत |
|---|---|---|---|
| १ | ०ते१४ | १२६ | १९.६८ |
| २ | १५ ते २१ | ९३ | १४.५३ |
| ३ | २२ ते ४० | २२३ | ३४.८४ |
| ४ | ४१ ते ६० | १२५ | २०.७८ |
| | एकुण | ६३२ | १०० |

आलेख क्रमांक – 3. निमगाव गावचे वयोगटानुसार लोकसंख्येचे षेकडा प्रमाण




निमगाव गावातील नमुना सर्वेक्षणाच्या आधारे वयोगटानुसार लोकसंख्येच्या शेकडा प्रमाणाचा अभ्यास केला असता असे दिसुन येते की ० ते १४ या वयोगटामध्ये १६.६ टक्के मुलांचा सहभाग आहे. १५ ते २१ या वयोगटामध्ये १४.५ टक्के लोकांचा सहभाग आहे.

### 5. वैवाहिक स्थिती –

निमगाव गावातील नमुना सर्वेक्षणाच्या आधारे वैवाहिक स्थिती अशी आहे. ६३२ लोकसंख्येपैकी विवाहितांची संख्या ३८६ असून

अविवाहितांची संख्या २४३ आहे. हे प्रमाण टक्केवारी नुसार ६०.७८ टक्के विवाहित ३६.२१ टक्के अविवाहित असे आहे.

*तक्ता क्रमांक – 4. निमगाव वैवाहिक स्थिती शेकडा प्रमाण*

| अ.क्र | वैवाहिक स्थिती | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विवाहीत | ३८९ | ६०.७८ |
| २ | अविवाहीत | २४३ | ३९.२१ |
| | एकुण | ६४० | १०० |

*आलेख क्रमांक – 4. निमगाव वैवाहिक स्थिती शेकडा प्रमाण*




निमगाव या गावामध्ये एकुण लोकसंख्येपैकी ६०.७८ टक्के विवाहीत लोक आहेत. तर ३६.२१ टक्के लोक हे अविवाहीत आहेत. अविवाहीत लोकामध्ये लहान मुले आणि तरूणांचा मोठया प्रमाणात सहभाग आहे.

### *6. शिक्षण –*

निमगाव हे खेडेगाव असल्याने पूर्वी येथे शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे पूर्वी निरक्षर लोकांचे प्रमाण जास्त होते. कालांतराने शाळा निघाल्याने साक्षर लोकांचे प्रमाण वाढले. निमगावातील नमुना सर्वेक्षनाच्या आधारे अभ्यासलेली शैक्षणिक स्थिती पुढीलप्रमाणे

*तक्ता क्रमांक – 5. निमगाव गावाची शैक्षणिक स्थिती शेकडा प्रमाण*

| अ.क्र | शैक्षणिक पातळी | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | निरक्षर | १५३ | २४.२ |
| २ | चौथी | १०९ | १७.२ |
| ३ | सातवी | ८४ | १३.३ |
| ४ | दहावी | १३६ | २१.५ |
| ५ | बारावी | ७६ | १२ |
| ६ | पदवीधर | ५६ | ८.९ |
| ७ | पदव्युत्तर | ४ | ०.६ |
| ८ | इतर | १४ | २.२ |
| | एकूण | ६३२ | १०० |

आलेख क्रमांक – 5. निमगाव गावाची शैक्षणिक स्थिती शेकडा प्रमाण




वरील आलेखावरून आपणास निमगाव गावातील शैक्षणिक स्थितीचा अंदाज येतो. या गावात ५ वी ते १० वी यादरम्यान शिकलेल्या लोकांचे प्रमाण सर्वाधिक असून निरक्षर लोकांचे प्रमाणही लक्षणिय आहे. मात्र पदव्युत्तर शिक्षण व अन्य प्रकारचे उच्च शिक्षण यांचे प्रमाण नगण्य आहे.

### *7.स्थलांतर –*

निमगाव गावात स्थलांतराची प्रवृत्ती कमी आढळते. ६३२ लोकसंख्येपैकी केवळ १७ लोकांनी स्थलांतर केलेले आहे. त्यापैकी १२ लोकांनी पुण्याला स्थलांतर केलेले आहे तर ५ लोकांनी मुंबईला स्थलांतर केलेले आहे. निमगाव हे पुणे, पिंपरी चिंचवड, चाकण, आणि राजगुरूनगर या नागरी भागापासून जवळ असल्याकारणाने गावामधील या विविध औद्योगिक परिसरामध्ये काम करणारे लोक दैनिक प्रवास करतात. त्यामुळे कायमस्वरूपीचे स्थलांतर हे कमी प्रमाणात झालेले दिसते. त्याचप्रमाणे गाव आणि परीसरामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यानेही स्थलांतराचे प्रमाण कमी दिसून येते.

### *निष्कर्ष –*

१.निमगावात हिंदूंची लोकसंख्या ८१.४८ टक्के असून इस्लाम आणि बौद्धधर्मीय लोकांची संख्या अनुक्रमे ६.२६ टक्के आहे.
२.निमगावचे लिंग गुणोत्तर १०००:६६३ असे आहे.
३.निमगावात सर्वात जास्त लोक १५ ते ५६ या वयोगटातील असून १६.६ टक्के लोक ०ते १४ वयोगटात आहेत आणि १०.१ टक्के लोक ६० पेक्षा जास्त वयोगटातील आहेत.
४.विवाहित लोकांचे प्रमाण ६०.६८ टक्के असेन अविवाहित लोकांचे प्रमाण ३६.२१टक्के आहे.
५.निरक्षर लोकांची संख्या २४.२टक्के आहे.
६.सर्वेक्षण केलेल्या कुटुंबांपैकी १७ लोकांनी स्थलांतर केलेले आहे.

### *संदर्भ ग्रंथ –*

१.भूगोलाची मूलतत्वे – खंड १ – ए.बी.सवदी
२.लोकसंख्या भूगोल – प्रा. के.ए.खतीब
३.लोकसंख्या भूगोल – डॉ.टी.एन. घोलप
४.मानवी लोकसंख्या भूगोल – ए.बी.सवदी आणि पी.एस.कोळेकर
५.मानवी साधनसंपत्ती भूगोल – प्रा.डी.एम.मारकड

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org